|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**संलग्नता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/०५/संलग्नता/९०/२०२३ दि.०१/०४/२०२३

# जाहिर आवाहन (दि.१५ एप्रिल, २०२३ पर्यत)

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नव्याने होऊ घातलेल्या बृहत आराखड्याच्या अनुषंगाने शासनाला थेट सूचना [suggestion] देणेबाबत.**

संदर्भ :- शासनाने दि. ३१ मार्च,२०२३ रोजीच्या ऑनलाईन सभेत दिलेले निर्देश

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा बृहत आराखडा (उद्दिष्टनिष्ठ आराखडा) नव्याने तयार करावयाचा आहे.

आजच्या जागतिकीकरण व संगणकीकरणाच्या काळात कबचौउमवि अधिक्षेत्रातील जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील युवक/युवतींना चारित्र्यसंपन्न व प्रगल्भ नागरिक बनविणेसाठी तसेच त्यांचे उद्याचे आर्थिक व व्यावसायिक जीवन संपन्नमय व प्रगतीशील होण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकारितेतील सेवारहित व न्यूनविकसित क्षेत्रांच्या गरजांचा योग्य तो विचार करुन उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वसमावेशक, समन्यायी वाटप होण्याच्यादृष्टीने आणि विद्यापीठाचा व पर्यायाने राष्ट्राचा विकास होण्याच्यादृष्टीकोनातून युवक/युवतींना अधिक दर्जेदार, गुणवत्तापुर्ण तसेच व्यवसायाभिमुख उच्च शिक्षण देणे ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार काळाची गरज आहे.

आजचे शिक्षण, उच्च शिक्षणाप्रती असलेल्या अपेक्षा व जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील भौगोलिक स्थितीचा अभ्यास करुन विद्यापीठ परिक्षेत्रात कोणकोणते ठिकाणी नवीन महाविद्यालये आणि नाविण्यपूर्ण अभ्यासक्रम याकरीता शासनाने सर्व्हेक्षणाव्दारे आढावा घेण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन दिलेली आहे.

शासनाने दिलेल्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांसाठी नव्याने तयार करावयाच्या बृहत आराखड्यासंबंधी शासनाने थेट सूचना (suggestions) मागविण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासनाने दिलेली लिंक https://wahgi.ncog.gov.in/MaharashtraEducation/Mhedu1/SuggestionForm विद्यापीठाचे संकेतस्थळ www.nmu.ac.in येथे उपलब्ध आहे.

तरी जळगाव, धुळे, व नंदूरबार जिल्हयातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक, पालक, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि शिक्षणतज्ञ इत्यादिंनी आपल्या सूचना हया दिनांक १५/०४/२०२३ पावेतो वर दिलेल्या वेबलिंक फॉर्ममध्ये भरुन शासनास पाठवाव्यात अशी विद्यापीठाच्या वतीने विनंती करण्यात येत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

Sd/-

(प्रा.एस.टी.इंगळे)

प्र-कुलगुरु

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,

जळगांव.

प्रत :-

०१) मा.उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

०२) मा.सह संचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव

०३) मा.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कबचौउमवि, जळगाव

**कृपया सदर जाहिर आवाहन बाबत संबंधित समन्वयक यांना अवगत करावे.**

०४) मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

**कृपया वरील जाहिर आवाहनास जळगाव, धुळे, नंदूरबार या तीनही जिल्हयातील दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी, ही विनंती.**